www.aiche.org/ccps

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
www.acutech-consulting.com

# धोके ओळखणे व जोखीम पडताळणीमधे आपली भूमिका कोणती?

सप्टेंबर २०१४

धोके ओळखणे व जोखीम पडताळणीमध्ये (हिरा–HIRA) तुमच्या प्रक्रीयेतील धोके ओळखणे, संभाव्य दुर्घटनांची रूपरेखा काढणे, संरक्षक गोष्टी ओळखणे, माणसे, पर्यावरण, मालमत्ता आणि व्यवसायास असलेल्या जोखमीचे मूल्यमापन करणे इत्यादीमध्ये अंतर्भूत सर्व कृतींचा समावेश होतो. या आढावा घेण्याला तुमच्या कारखान्यात प्रक्रीया धोके पडताळणी (प्रोसेस हजार्ड ॲनालिसिस – पी.एच.ए.) जे नांव अमेरिकेसह काही देशांच्या कायद्यांत वापरले जाते. सीसीपीएस् आता "हिरा" हा शब्दप्रयोग वापरते कारण त्यामध्ये विशेषतः जोखीम पडताळणीचा अंतर्भाव आहे जी अलिकडच्या काळात अनेक कंपन्यांमध्ये या कृतीची भाग बनली आहे. अमेरिका व इतर अनेक देशांतील कायदे तसेच अनेक कंपन्यांतील प्रक्रीया सुरक्षा मानके व धोरणांमध्ये हिरा/पी.एच.ए. अभ्यासात प्रत्यक्ष कामगारांचा – संयंत्र चालक, देखभाल कामगार, आणि संयंत्रातील उपकरणे प्रत्यक्ष चालवणाऱ्या व देखभाल करणाऱ्या अन्य कामगारांचा सहभाग आवश्यक आहे.



आगीच्या स्त्रोताची काही उदाहरणे (१) स्थिर विद्युत (२) वाहन (३) वेल्डींग (४) उघडी ज्योत (५) ग्राइंडींग (६) सदोष विद्युत जोडणी (७) भट्टी (८) पायरोफोरीक किंवा सडणारे पदार्थ

हिरा/पी.एच.ए.चा अभ्यास करण्याची अनेक तंत्रे आहेत.

प्रक्रीया उद्योगांमध्ये सर्वसाधारणपणे वापरल्या जाणाऱ्या हिरा तंत्रामध्ये "तर काय (व्हॉट इफ)" अभ्यास, चेकलीस्ट, एकत्रितपणे व्हॉट इफ व चेकलीस्टचा अभ्यास, हझार्ड आणि ऑपरॅबिलीटी (हॅझॉप) अभ्यास आणि अन्य काही तंत्रांचा समावेश होतो. तुमच्या कारखान्यात या पध्दतींचा संयुक्तपणे वापर होत असेल आणि तुमच्या हिरा/पी.एच.ए. पध्दतीला वेगळे नांव असेल. तंत्र कोणतेही असो कारखान्यातील कामगाराची भूमिका महत्वाची असते. तुम्ही उपकरणे रोज हाताळता व त्यांची देखभाल करता, ते प्रत्यक्ष कसे चालते त्याहीपेक्षा ते कसे बिघडू शकते ते समजून घ्या. असे म्हणतात की कारखान्यात तीन संयंत्रे असतात – एक जे अभियंते व व्यवस्थापकांच्या मनात असते, दुसरे जे कामगारांच्या मनात असते, आणि तिसरे जे प्रत्यक्ष असते. ही तीनही संयंत्रे एक करणे ही तुमच्या मुख्य भूमिकांमधील एक आहे.

## हिरा/पी.एच.ए. परीणामकारक करण्यात आपण कसे योगदान देऊ शकता?

तुम्हाला हिरा/पी.एच.ए. अभ्यासात सामील होण्यास सांगितले तर तो परीणामकारक करण्यासाठी तुम्ही पुढील गोष्टी करू शकता:

- एखाद्या प्रक्रीयेतील टप्पे प्रत्यक्ष कसे कार्यान्वित होतात विशेषतः ते लिखित पध्दतीपेक्षा वेगळे असतील तर त्याची तुमच्याकडील माहिती द्या. हिरा/पी.एच.ए. गटास त्याची कारणे विषद करा म्हणजे ते ती तफावत दूर करतील आणि प्रत्यक्ष आणि लिखित पध्दती समान करतील
- हिरा/पी.एच.ए. अभ्यासापूर्वी तुम्ही काय करणार आहात याविषयी तुमच्या सहकार्यांशी चर्चा करा. अभ्यासगटाने कोणत्या विषयावर चर्चा करावी असे त्यांना वाटते ते तुम्हास सांगण्यास सांगा.
- सामग्री व उपकरणे आणि धोक्याची घंटा किंवा सुरक्षा पध्दतींमधील तुमच्या व तुमच्या सहकाऱ्यांच्या वर्षानुवर्षाच्या कार्यकालीन अनुभवाच्या गोष्टी सांगा योग्य पध्दत कोणती, अयोग्य पध्दत कोणती आणि भूतकाळात कोणत्या चुका झाल्या याची अभ्यासगटास माहिती असल्याची खात्री करा.
- एखाद्या कामगाराची कृती उदाहरणार्थ धोक्याच्या घंटेला प्रतिसादात्मक कृती जी त्या गटाला सुरक्षारक्षक वाटते ती सर्व कामगारांना माहीत आहे व आवश्यक त्यावेळी प्रक्रीया सुरक्षित ठेवण्यासाठी करतील याची खात्री करा.
- भिडस्त राहू नका! पूर्वदक्षतेने तुमचे ज्ञान व अनुभव विषद करा आणि कोणी विचारणा करण्याची वाट पाहू नका.
- ल्क्षात ठेवा की तुमची भूमिका स्वतः शिकण्याची व दुसऱ्यांना शिकवण्याची आहे. हिरा/पी.एच.ए. करणाऱ्या निष्णात व्यक्तिकडून तुम्ही शिकू शकता आणि ते तुमच्याकडून शिकू शकतात विशेषतः संयंत्रामध्ये चुकीच्या गोष्टी कशा घडू शकतात. हिरा/पी.एच.ए. पूर्ण झाल्यानंतर तुम्ही काय शिकलात ते तुमच्या सहकामगारांस विषद करा.

**तुमचा अनुभव चांगला हिरा/पीएचए करण्यासाठी वापरा व तुमचा कारखाना सुरक्षित करा!**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा ६४६–४९५–१३७१

हे बीकॉन सहसा अरेबिक, अफ्रीकन, चिनी, झेक, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रोमानियन, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तेलगू, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.